<u>नियमित फौजदारी खटला क्रमांक १६९/२०२१ मधील निशाणी ११ वरील आदेश</u>
(CNR No.MHRT030014792021)

अर्जदार मतीन युसूफ मुल्ला यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४५१ प्रमाणे रत्नागिरी शहर पोलीस ठाणे गुन्हा र.नं. ४२५/२०२१ मध्ये मुद्देमाल म्हणुन जप्त केलेल्या हिरो मॅस्ट्रो एज, तिचा क्रमांक एम.एच.०८/एएम/३२१२ या पांढऱ्या रंगाच्या गाडीचा (दुचाकीचा) ताबा मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदारच्या कथनानुसार ते नोकरीनिमीत्त परदेशी असतात, सदरची गाडी ही त्यांच्या पत्नीकडे असते, दैनंदिन दिनक्रमामधील काम करण्यासाठी अर्जदार यांच्या पत्नीला सदरची गाडीची आवश्यकता आहे. पोलीसांनी सदरची गाडी जप्त केल्याने अर्जदार यांच्या पत्नीला दैनंदीन दिनक्रमांमधील काम करण्यासाठी फार अडचण होत आहे. रत्नागिरी हे शहर समुद्राकाठी वसलेले आहे. रत्नागिरी येथील हवा खारी आहे. पोलीसांनी जप्त केलेली गाडी ही पोलीस ठाण्यात उभी करुन ठेवलेली आहे. सदरची केस चालवून निकाली होण्यास अजून काही कालावधी जाणार आहे. त्यामुळे गाडी खाऱ्या हवामानामुळे व मोठ्या प्रमाणात पडणाऱ्या दवामुळे व उन्हामुळे ती गंजून जाणार आहे. त्यामुळे तिच्या इंजिनमध्ये बिघाड होण्याची भिती आहे. तसे झाल्यास अर्जदार याचे पैशाच्या स्वरुपात भरुन येणार नाही असे अपरिमीत नुकसान होणार आहे. सदर गाडी अर्जदार याच्या ताब्यात मिळाल्यावर ती गाडी अर्जदार कोणालाही विकणार नाही अथवा हस्तांतरीत करणार नाही, तसेच सर्व अटी शर्तींचे

अर्जदार काटेकोरपणे पालन करेल. त्यामुळे जप्त हिरो मॅस्ट्रो एज क्रमांक एम.एच. ०८/एएम/३२१२ ही गाडी परत मिळणेसाठी अर्जदार याने सदरचा अर्ज केलेला आहे.

३. सरकारी वकील यांनी या अर्जावर म्हणणे देवून कथन केले आहे की, अर्जदार परत मागत असलेली गाडी या केसमधील गुन्ह्याचे कामी वापरण्यात आलेली असून ती कुठल्याही प्रकारे अर्जदाराने विल्हा केल्यास त्याचा या केसचे कामी विपरीत परिणाम होणार आहे. ती अर्ज फेटाळण्याची विनंती त्यांनी केली आहे.

४. आरोपी क्र.१ व २ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी १४ वर दाखल करुन कथन केले आहे की, प्रस्तुत अर्जातील उल्लेखीत गाडी ही आरोपी नं. १ व २ यांच्या मालकीची नाही. त्यामुळे कोर्टाचे होणा-या निर्णयांस आरोपी क्र.१ व २ यांची कोणतीही हरकत असणार नाही.

५. तपास अधिकारी यांनी निशाणी १३ वर अर्जास म्हणणे देवून कथन केले आहे की, जप्त मोटर सायकल ही जरुर त्या अटी व शर्तीवर अर्जदारच्या ताब्यात देण्यास काही हरकत नाही.

६. या कामी प्रथम खबर देणार यांना नोटीस काढण्यात आली. परंतु, सदरच्या नोटीसची बजावणी त्यांच्यावर झालेली नाही.

७. अर्जदारने जप्त मोटर सायकलचे आर.सी. बुकची अस्सलवरुन तपासलेली प्रत आणि अर्जदारने त्याच्या आधारकार्डची अस्सलवरुन तपासलेली प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. तसेच, अर्जदारने निशाणी १२ येथे अर्जाच्या पुष्ट्यर्थ त्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असून आवश्यक त्या रक्कमेच्या व योग्य अटी व शर्तींच्या आधारे सदरचा मुद्देमाल ताब्यात मिळणेची विनंती केलेली आहे. या कामी जप्त केलेली दुचाकी ही पोलीस ठाण्यात उभी करुन ठेवलेली आहे. सदरची केस चालवून निकाली होण्यास अजून काही कालावधी जाणार आहे. त्यामुळे गाडी पोलीस ठाण्यात तशीच ठेवल्यास खाऱ्या हवामानामुळे व मोठ्या प्रमाणात पडणाऱ्या दवामुळे व उन्हामुळे ती गंजून जाण्याची, तिच्या इंजिनमध्ये बिघाड होण्याची शक्यता आहे. जप्त केलेल्या दुचाकीची अन्य कुणीही मागणी केलेली नाही. त्यामुळे योग्य त्या अटी व शर्तींवर जप्त दुचाकी अर्जदार याचे ताब्यात देणे न्यायोचित होईल. तपास पुर्ण झाला असल्याचे आणि प्रसुत मुद्देमालाची आवश्यकता तपासकामी नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरचा मुद्देमाल म्हणजेच दुचाकी अर्जदार याला काही अटी व शर्तींवर ताब्यात देणे योग्य होईल. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. पोलीस निरीक्षक, रत्नागिरी शहर पोलीस ठाणे, यांना आदेश देण्यात येतो की, गुन्हा क्रमांक ४२५/२०२१ मध्ये जप्त केलेली हिरो मॅस्ट्रो एज दुचाकी क्रमांक एम.एच.०८/एएम/३२१२ ही अर्जदार यांच्या ताब्यात रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दहा हजार मात्र) चे हमीपत्र

दिल्यानंतर, देण्यात यावी. तसेच, सविस्तर पंचनामा करण्यात येवून तो दोषारोपपत्रामध्ये सामिल करण्यात यावा.

३. अर्जदारने सदरच्या दुचाकीमध्ये सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत कोणताही बदल करु नये किंवा विक्री करु नये, नाश करु नये, तसेच तिची किंमत कमी होईल असा कोणताही बदल करु नये.

४. अर्जदारने प्रकरणाच्या चौकशीसाठी सदर दुचाकीची आवश्यकता भासल्यास ती न्यायालयापुढे हजर करावी.

५. अर्जदारने सदर दुचाकीचे सर्व चारही बाजूंनी फोटो काढून दुचाकीचा ताबा मिळाल्यापासून सात दिवसांचे आत दाखल करणेचे आहेत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
GIRISH GUNDERAO
ITKALKAR
Date: 2022.04.29
17:00:56 +0530

(गि. गुं. इटकळकर)

दिनांकः– २९/०४/२०२२

मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.

## -:CERTIFICATE:-

Judgment/order in ( Order below Exh.11 in R.C.C. No. 169/2021)

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.S.Sane |
| Court Name | :- | The Court of Chief Judicial Magistrate, Ratnagiri |
| Date of decision | :- | 29/04/2022 |
| Judgment signed by PO. on | :- | 29/04/2022 |
| Judgment uploaded on | :- | 29/04/2022 |